१४ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत कार्यरत न्यायालयांचे नुतनीकरण
(Redesigning of Existing Courts)
जिल्हा व सत्र न्यायालय लातूर यांच्या नियंत्रणाखालील औसा, जिल्हा लातूर येथील न्यायालयीन इमारतीच्या दुरुस्तीस / नुतनीकरणास देण्यात आलेली प्रशासकीय मान्यता रद्द करणेबाबत..........

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०१६/प्र.क्र.१७९/का.१२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख : १५ जून, २०१९

वाचा-

१ शासन निर्णय, विधि व न्याय विभाग क्रमांक : संकीर्ण २०१६/प्र.क्र.१७९(१)/का.१२, दिनांक २९ ऑगस्ट, २०१८
२ शासन निर्णय विधि व न्याय विभाग क्रमांकः सीसीबी १११५/१८/प्र.क्र.१४/का.१३, दिनांक १५ जुलै, २०१७
३ प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, जिल्हा व सत्र न्यायालय लातूर यांचे पत्र क्रमांक १५५३/ २०१९, दिनांक ०९ मार्च, २०१९

शासन निर्णय-

१४ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत राज्यातील न्यायालयांचे नुतनीकरण (Redesigning of Existing Courts) या कामांच्या मा.उच्च न्यायालय मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या; जिल्हा व सत्र न्यायालय लातूर यांच्या नियंत्रणाखालील औसा, जिल्हा लातूर येथील न्यायालयीन इमारतीच्या नुतनीकरणासाठी रुपये ४८,९५,०००/- (रुपये अठ्ठेचाळीस लक्ष पंचाण्णव हजार फक्त) इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकांना संदर्भाधीन अ.क्र. (१) येथील दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. संदर्भाधीन अ.क्र. (२) येथील दिनांक १५ जुलै, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये औसा, जिल्हा लातूर येथील नवीन इमारतीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असल्याने आता जुन्या इमारतीत दुरुस्ती / नुतनीकरणाची आवश्यकता नसल्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, जिल्हा व सत्र न्यायालय लातूर यांनी दिनांक ०९ मार्च, २०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. यास्तव, संदर्भाधीन दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या शासन निर्णयाअन्वये औसा, जिल्हा लातूर येथील न्यायालयीन इमारतीच्या दुरुस्ती / नुतनीकरणासाठी देण्यात आलेली प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१५१५२६०४२९१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhagyashree Rajendra Bhaidkar

Digitally signed by Bhagyashree Rajendra Bhaidkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d567849462918ceb7579bb2b56247e927c039bbdf028022a8b9ce837a7c854bb, serialNumber=fb84fefefe4ee219c1bc35b35201c14eab0903e8194a7413a74eed93f32afdb0, cn=Bhagyashree Rajendra Bhaidkar
Date: 2019.06.15 15:13:27 +05'30'

(भाग्यश्री भाईडकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा.विरोधी पक्षनेता, विधान परीषद / विधान सभा
४. प्रबंधक (निरीक्षणे १), मा.उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई,
५. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, लातूर,
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता-१/२), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
७. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र मुंबई / नागपूर,
८. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय,
९. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई,
१०.जिल्हा कोषागार अधिकारी लातूर,
११.उप जिल्हा कोषागार अधिकारी लातूर,
१२. विधि व न्याय विभाग (का.९/२३), मंत्रालय, मुंबई
१३. निवडनस्ती (का.१२).